# कोल्हापूर जिल्हयातील धरणग्रस्तांच्या पुर्नवसनाचे प्रश्न

**पुजा काकासाहेब चव्हाण**
संशोधक विद्यार्थीनी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**सारांश:**

महाराष्ट्रात तसेच कोल्हापूर जिल्हयात शेतीच्या विकासासाठी आणि औद्योगिक गरजांच्या पुर्ततेसाठी अनेक प्रकल्प योजना हाती घेण्यात आल्या. परंतु या प्रकल्पांमुळे विस्थापितांच्या पुनर्वसनाच्या समस्येकडे शासनाचे पुर्णपणे दुर्लक्ष झालेले दिसून येते. कोल्हापूर जिल्हयातील प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांचे विस्थापन पुनर्वसित वसाहतीत करण्यात आले. परंतु त्यांना मुलभूत व प्राथमिक सुविधांची पुर्तता करण्यात व चांगल्या बागायती पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात शासनास अपयश आलेले दिसून येते. परिणामी प्रकल्पग्रस्त आपल्या न्याय हक्कापासून वंचित राहिला आहे.

**प्रस्तावना:**

या शोधप्रबंधाच्या संशोधनासाठी कोल्हापूर जिल्हयातील एकूण १३ पाटबंधारे प्रकल्पांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नांचे विवेचन करण्यात आले आहे. १३ प्रकल्पांपैकी १ दुधगंगा हा मोठा प्रकल्प असून, १२ मध्यम प्रकल्पांमध्ये कुंभी, कडवी, कासारी, चित्री, चिकोत्रा, जांबरे, जंगमहट्टी, घटप्रभा, पाटगांव, आंबेओहोळ, सर्फनाला व धामणी या प्रकल्पांचा समावेश होतो. या प्रकल्पांच्या प्रत्यक्ष कामाची सुरूवात करताना लोकप्रतिनिधींनी व शासकीय अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांना अनेक आश्वासने दिली परंतु त्या आश्वासनांची पूर्तता झाली नाही. वास्तविक पाहता प्रकल्पाच्या कामासोबत पुनर्वसनाचेही काम गतीने झाले पाहिजे परंतु महाराष्ट्राच्या पुनर्वसनाचा इतिहास पाहता तसे झालेले नाही. दूधगंगा व वारणा या २ मोठया प्रकल्पांची कामे पूर्ण होऊन २० ते ३० वर्षे झाली तरी अद्याप या प्रकल्पांचे प्रकल्पग्रस्त पुनर्वसनापासून वंचित राहिलेले आहेत. या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांकडून शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजविण्यात २ ते ३ पिढयांची फरफट झालेली आहे. त्यामुळे आज प्रकल्पग्रस्तांची अवस्था बिकट झालेली आहे. ज्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप झालेले आहे, त्यातील बहुतांशी जमीनी हया जिरायती, क्षारपड, नापीक असून अनेक वर्ष झाले तरी त्या जमिनीला शासनामार्फत सिंचनाचा लाभ देण्यात शासन असमर्थ ठरले आहे. तसेच सरकारने बाधित क्षेत्रातील जमिनीचा मोबदला सुद्धा अत्यल्प स्वरूपाचा दिलेला आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या आर्थिक उत्पादनात प्रचंड घट झालेली आहे. त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. यामुळे प्रकल्पग्रस्तांवर मोलमजूरी करण्याशिवाय गत्यंतर राहिलेले नाही.

पर्यायी जमिनीच्या समस्या, अपूर्ण नागरी सुविधा, रोजगार व नोकरीमधील अडचणी, प्रकल्पग्रस्त दाखला, पाणीभत्ता, निर्वाहभत्ता, दारिद्रय रेषेखालील रेशन कार्ड, प्राथमिक सुविधांची अपरिपूर्णता, भूखंड वाटपातील अडथळे अशा अनेक प्रकल्पग्रस्तांच्या समस्या व प्रश्नांची सोडवणूक करण्यात प्रशासनाला अपयश आलेले आहे. या अपयशाची महत्वाची कारणे म्हणजे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत राजकीय मंडळींचे दुर्लक्ष आणि उदासिनता, शासकीय अधिकाऱ्यांची उदासिनता, प्रशासनाचा गलथान कारभार, विविध खात्यांचा निष्काळजीपणा, लालफितीचे कारण दाखवून वेळकाढूपणा, निधीची कमतरता, सिंचन घोटाळा व सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मंजूरी बाबतची उदासीनता, कर्मचारी व अधिकारी वर्गाची कार्याची संथगती, खात्याखात्यांमधील समन्वयाचा अभाव आदि कारणामुळे पुनर्वसनाचे प्रश्न रखडतच चालले आहेत. तसेच जिल्हा पुनर्वसन विभागाच्या कामाची व्याप्ती प्रचंड आहे. अपुरे मनुष्यबळ, प्रलंबित प्रकरणे, वाढती न्यायालयीन प्रकरणांची संख्या, दलालांचा वावर या सर्व प्रकारांमुळे पुनर्वसन कामाचा ताण अधिकच वाढत चालला आहे. यातून प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांची सोडवणूक होण्याऐवजी वाढतच चालली आहे.

महाराष्ट्रात धरणग्रस्तांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी १९७०—८० या दशकात विविध धरणग्रस्त संघटना अस्तित्वात आल्या. या संघटनांच्या प्रयत्नांतून, आंदोलनातून शासनाला प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य करण्यास भाग पाडले गेले. महाराष्ट्र राज्यातील विविध धरणग्रस्त संघटनांच्या रेटयामुळे १९७६ साली देशात प्रथमतः महाराष्ट्र राज्यात पुनर्वसनाचा कायदा

अस्तित्वात आला. १९७६ च्या कायद्यात काही त्रुटी आढळल्याने १९८६ चा पुनर्वसन कायदा अस्तित्वात आला. तद्नंतर १९८६ च्या कायद्यात काही त्रुटी आढळल्याने १९९९ चा पुनर्वसन कायदा अस्तित्वात आला. याशिवाय पुनर्वसनासंदर्भात केंद्रसरकारने २००३ साली राष्ट्रीय पुनर्वसन व पुनर्स्थापना धोरण व २००७ साली राष्ट्रीय पुनर्वसन व पुनर्स्थापना धोरण जाहीर केले. २००६ साली आधी पुनर्वसन मगच धरण हा कायदा संमत केला व महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण ही स्वतंत्र यंत्रणा स्थापन केली. शासनाकडून पुनर्वसनासंदर्भात वेळोवेळी अनेक कायदे, निर्णय, धोरणे तयार करण्यात आली. परंतु त्या तरतुदींची व कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी शासनामार्फत झाली नाही.

परिणामी कोल्हापूर जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांचे अद्याप विकसनशील व दर्जेदार पुनर्वसन झालेले नाही. प्रकल्पग्रस्तांनी वेळोवेळी शासनाशी संघर्ष करून आपल्या मागण्या मान्य करण्यास भाग पाडले. यासाठी प्रकल्पग्रस्तांनी धरणग्रस्त संघटनांच्या आधारे ठिय्या आंदोलने, मोर्चा, सभा, सम्मेलने, घेराव, उपोषण अशा मार्गाचा अवलंब करून वेळोवेळी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. आजपर्यंत प्रकल्पग्रस्तांच्या संघटनांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत. जर या संघटनांमार्फत शासनाच्या अनागोंदी कारभारावर आवाज उठवला गेला नसता तर आज याच्याही पलिकडे प्रकल्पग्रस्तांची दयनीय अवस्था दिसून आली असती.

**उद्दिष्टे :**

१) कोल्हापूर जिल्हयातील पाटबंधारे प्रकल्पाच्या पुनर्वसनाच्या संदर्भातील समस्यांचा शोध घेणे.
२) कोल्हापूर जिल्हयातील पाटबंधारे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
३) शासनाच्या पुनर्वसनासंदर्भातील धोरण निर्धारण करणाऱ्या यंत्रणांचा अभ्यास करणे.
४) पुनर्वसन धोरण अंमलबजावणी संदर्भातील त्रुटी व अडचणींचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष:**

शासन विकासासाठी अनेक योजना हाती घेते परंतु त्या विकास योजनांमुळे झालेल्या परिणामांवर आणि मर्यादांवर मार्ग काढण्यास शासनास अपयश आलेले आहे. शासनाची अकार्यक्षमता, वेळकाढूपणा, निष्काळजीपणा, नियंत्रण व समन्वयाचा अभाव, अनागोंदी कारभार या सर्व प्रशासकीय अडथळयांमुळे जिल्हयातील पुनर्वसनाचे काम रखडतच चालले आहे. महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पाकरीता पुरेसा निधी केंद्र शासनामार्फत उपलब्ध न झाल्याने पश्चिम महाराष्ट्रातील बरेच प्रकल्प रखडले आहेत. याशिवाय कोल्हापूर जिल्हयातील प्रकल्पांवर झालेल्या एकूणच खर्चाचा आढावा घेता प्रकल्पांवर अवाढव्य कोटयावधी खर्च होऊन सुद्धा जिल्हयातील काही प्रकल्प अपूर्ण आहेत. तर पूर्ण झालेल्या प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रश्न २० ते ३० वर्षे झाली तरी अद्याप मार्गी लागलेले नाही.

**संदर्भ**

१) व्होरा राजेंद्र, (१९९४), मुळशी सत्याग्रह, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
२) डॉ. पाटणकर भारत, (२००९), श्रमिक मुक्ती दल, मूलभूत भूमिकेचा जाहिरनामा.
३) पाटील विश्वास, (२००१), झाडाझडती, राजहंस प्रकाशन, पुणे.
४) प्रा. शेवाळे विठ्ठल (२०१८), कॉ. दत्ता देशमुख आणि पाणीप्रश्न, कॉ. दत्ता देशमुख, प्रकाशन — सोलापूर, २०१८, प्रकाशक—कॉ. दत्ता देशमुख पुरोगामी विचारमंच, कोल्हापूर.
५) आंदोलन शाश्वत विकासासाठी, वर्ष सहावे/अंक दोन, सप्टेंबर २०१४.
६) आंदोलन शाश्वत विकासासाठी, वर्ष सहावे/अंक सात, मार्च २०१५.
७) जलदूत, महाराष्ट्र पाटबंधारे कर्मचारी कल्याण केंद्र, दिवाळी विशेषांक, २०१७.
८) जिल्हा पुनर्वसन कार्यालयीन अहवाल, कार्यालयीन बैठकीचा इतीवृत्तांत, ३ डिसेंबर २०१३.
९) पुनर्वसित गठीत समितीच्या बैठकीचे इतिवृत्त, २५ जुलै, २०११.
१०) भूसंपादन व पुनर्वसन प्रगतीपथावर असणाऱ्या व घळभरणी व्हावयाच्या प्रकल्पांची संक्षिप्त टिपणी, कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर.